F/c

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३ , महापालिका मार्ग पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी- २२६१७९६९ , फॅक्स - २२६९०००७
E-mail : desk18@dtemaharashtra.gov.in Internet : www.dtemaharashtra.gov.in

तात्काळ - ई-मेलद्वारे / स्पीड पोस्टद्वारे

क्र. १८/तंशिसं/डीबीटी-पोर्टल/२०२०/५५ .
दिनांक :१४/०२/२०२०

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई / पुणे / नाशिक / औरंगाबाद / अमरावती / नागपूर

विषय : महाडीबीटी पोर्टलवरील योजनांच्या कार्यवाहीसाठी वाढीव मुदतीबाबत ......
संदर्भ : या संचालनालयाचे पत्र क्र. १८/तंशिसं/डीबीटी-पोर्टल/२०१९/५७० दि.२३/१२/२०१९

महोदय,

**आपले सरकार डी.बी.टी.पोर्टल** ( संकेतस्थळ : **https://mahadbtmahait.gov.in** ) वर महाराष्ट्र शासनाच्या विविध योजनांचा समावेश करण्यात आलेला असून त्यामधील खालील योजना तंत्रशिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येतात.

१) राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना
२) डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना
३) उच्च व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये शिक्षण घेणाऱ्या राज्यातील अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांकरिता शिष्यवृत्ती योजना ( भाग-१, वैद्यकीय अभ्यासक्रम वगळून )

सन २०१९-२० च्या **महाडीबीटी पोर्टलवरील** उपरोक्त योजनांच्या अंमलबजावणीसाठी, उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये, सर्व विभागीय कार्यालयांना त्यांच्या अखत्यारित येणाऱ्या संस्थांना व संस्थामार्फत त्यामध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना, योजनांसाठीचे विद्यार्थ्यांकडून अर्ज स्विकारण्यासाठी **दि.१५/०१/२०२०** पर्यंत व संस्थांना / विभागीय कार्यालयांना तपासणीसाठी **दि.२२/०१/२०२० पर्यंत** मुदतवाढ देण्यात आलेली होती आणि **"विद्यार्थी / संस्था / विभागीय कार्यालयांनी पोर्टलवर वेळोवेळी जाहिर केलेल्या वेळापत्रकानुसार आपापल्या स्तरांवरील कार्यवाही न चुकता पूर्ण करावी."** असेही कळविण्यात आलेले होते. तरीदेखील काही विद्यार्थी योजनेचे अर्ज भरु शकले नाहीत त्यामुळे विद्यार्थ्यांच्या हितासाठी शासनाने विद्यार्थ्यांकडून अर्ज स्विकारण्यासाठी **दि.२९/०२/२०२०** पर्यंत मुदतवाढ जाहीर केली असून संस्थांस्तरांवरील तपासणीसाठीचे प्रलंबित अर्ज, तपासणी करुन निकाली काढण्यासाठी सोबत जोडलेल्या महाडीबीटी पोर्टलवर जाहिर केलेल्या वेळापत्रकानुसार संस्थांना अर्ज तपासणी करुन **दि.०८/०३/२०२० पूर्वी** निकाली काढण्याबाबत सूचित केले आहे.

तरी सर्व विभागीय कार्यालयांना या पत्राद्वारे सुचित करण्यात येतें की, आपल्या अधिनस्थ असलेल्या सर्व संस्थांना, पात्र विद्यार्थ्यांकडून विहित मुदतीच्या आत अर्ज भरुन घेण्याबाबत व संस्थांच्या लॉगीन आयडी अंतर्गत तपासणीसाठी प्रलंबित असलेले अर्ज तसेच **Sent Back ( Revert झालेले ) अंतर्गत** असलेल्या अर्जांची त्रुटी दूर करुन अंतिम दिनांकापर्यंत प्रलंबित न ठेवता संबंधित योजनेच्या शासन निर्णयानुसार सर्व प्राप्त अर्जांची तपासणी करुन निकाली काढण्याबाबत सूचित करावे. तसेच, सर्व विभागीय कार्यालयांनीदेखील त्यांच्या लॉगीन आयडीमधील विद्यार्थ्यांच्या प्राप्त झालेल्या ऑनलाईन अर्जांची संबंधित योजनेच्या शासन निर्णयानुसार सर्व प्राप्त अर्जांची तपासणी करुन निकाली काढावेत.

तसेच विद्यार्थी / संस्था / विभागीय कार्यालयांनी त्यांच्या लॉगीनमध्ये **Sent Back अंतर्गत** व **तपासणीसाठी** प्रलंबित असलेले अर्ज अंतिम तारखेनंतर सिस्टिमद्वारे Automatic नामंजूर करण्यात येतील व याची सर्वस्वी जबाबदारी संबंधितांची राहील आणि यानंतर कोणतीही मुदतवाढ देण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

आपला,
( डॉ. सु.प.पायलकर.)
प्र.सहसंचालक, तंत्रशिक्षण संचालनालय,मुंबई.

प्रत : १) मा. सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, ४ था मजला, मंत्रालय, मुंबई-३२ यांना माहितीसाठी सविनय सादर.
२) मा. प्रधानसचिव, अल्पसंख्यांक विकास विभाग, ७ वा मजला मंत्रालय, मुंबई-३२ यांना माहितीसाठी सविनय सादर.
३) मा. संचालक, माहिती व तंत्रज्ञान संचालनालय,पाचवा मजला,मंत्रालय ॲनेक्स बिल्डिंग, मादाम कामा रोड, मुंबई : ३२.

---

पृष्ठांकन क्रमांक : तंशिविकाअ/शिक्षण/मान्यता/२०२०/444
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती.
दिनांक : १४.०२.२०२०

सहसंचालक,तंत्रशिक्षण वि.का.
अमरावती.

प्रत:

१. प्राचार्य,सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्था अमरावती विभाग अमरावती यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीकरीता अग्रेषित.
२. प्रोग्रामर,तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,अमरावती यांना विभागीय कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यासाठी.